


"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर

‘ई-साहित्य प्रतिष्ठान’
सादर करीत आहे.
डॉ. अनंत पावसकर लिखित
‘डीजे’ - जल्लोष!-
म्हणजे नेमकं काय??

© - डॉ. अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार व संगीत संयोजक)
anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!
फक्त ‘एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर
**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on**
**https://www.esahity.com**
(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा-
एक मिनिट थांबा- बस्स)
तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !

‘डीजे-जल्लोष’- म्हणजे नेमकं काय? ?-

लेखक : डॉ. अनंत पावसकर

प्रकाशन : ११ सप्टेंबर, २०२६

© esahity Pratishthan®2026

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

हे ‘ई-पुस्तक’ वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ‘ई-साहित्य’ प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

लक्षात घ्या.. हे बोलकं 'ई-बुक' आहे. या 'ई-बुक' मधील प्रत्येक 'फोटो'वर 'लिंक्स्' दिल्या आहेत, तसेच प्रत्येक निळ्या रंगातील मजकुर, यावर सुद्धा संबंधित 'लिंक्स्' दिलेल्या आहेत. फक्त 'क्लिक' करा, आणि मनसोक्त आनंद घ्या.

♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

**डॉ. अनंत पावसकर, (ज्येष्ठ सिने पत्रकार व माजी ध्वनिमुद्रण अधिकारी VENUS) (जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)**

**डॉ. अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या "फुलोरा" पुरवणीमधील "आठवणीतली गाणी" या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव1 आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे डॉ. अनंत पावसकर हे "व्हीनस" या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो**

अल्बम्समध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहिला आहे. कंपनीच्या त्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष! ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच, यातूनच ते "आठवणीतली गाणी" हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (सन्मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत). इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना "गुलमोहर" नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय डॉ. अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे ३५०

**अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत. मराठीतील पहिलं "ई-बुक" बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत यासाठी "आशीर्वाद" पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तसेच नुकतेच त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. "डॉक्टरेट" सुद्धा मिळाली! आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब यासह इतर अनेक ई-बुक्स "ई- साहित्य" तर्फे सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते "म्युझिक प्लॅनेट" ही त्यांची स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख. डॉ. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.**

**(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)**

♥

**"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर**

## माझे मनोगत

नमस्कार मित्रांनो.. "माझे मनोगत" म्हणून मी काही खास गोष्टी तुमच्या सोबत शेअर करतोय. "ई-साहित्य प्रतिष्ठान" या "उदयोन्मुख लेखकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या संस्थेचे कार्य खरोखरच अतुलनीय आहे. आज आपली पुस्तके "छापील" स्वरूपात प्रकाशित करणे ही बाब माझ्यासह अनेक लेखकांना अतिशय कठीण गोष्ट झाली आहे. प्रकाशक, नामवंत लेखकांची "पुस्तके" छापतात, प्रकाशित करतात! परंतु यामध्ये नवख्या लेखकांचे काय? कारण अमुक प्रकाशक.. त्या लेखकाला, त्याच्या कलाकृतीसाठी "मानधन" देणे तर दूरच! छपाईचा खर्च सुद्धा मागतात, हे अनेकांनी अनुभवले आहे. यात प्रकाशकांचा अजिबात दोष नाही. छपाईसाठी लागणारा कागद, छपाई आणि नंतर वितरण या गोष्टी अतिशय महागल्या आहेत, हे आपण जाणताच! आज, उद्या "ई-बुक्स" हेच माध्यम असणार आहे, ही काळाची गरज आहे! हे "ई साहित्य प्रतिष्ठान" यांनी ओळखले, याचे सर्व श्रेय सन्मा. "श्री. सुनीळ सामंत" यांना नक्कीच आहे! मित्रांनो, यातून या "ई साहित्य प्रतिष्ठानला" कोणतीही "आर्थिक कमाई" नसते. केवळ "साहित्य सेवा" हेच त्यांचे उद्दिष्ट्य! सलाम त्यांच्या कर्तृत्वाला!

असो! माझे स्वतःचे असे हे २८ वे "ई-बुक"! आणि मी "निर्मित" केलेली इतर आठ "ई-बुक" पाहता, हे "छत्तीसावे"

**ई-बुक! धनंजय कुलकर्णी आणि दिलीप ठाकूर या दिग्गज लेखकांची "ई बुक्स"! "संपादन/ले- आऊट करताना मनस्वी आनंद झाला, हे विशेष!**

**धन्यवाद मित्रांनो!**

**डॉ. अनंत पावसकर.**
**(ज्येष्ठ लेखक, पत्रकार आणि सिनेसंगीत अभ्यासक)**

♥

♥

**DJ जल्लोष ! - "डीजे" म्हणजे नेमकं काय?**

**सध्या "आपल्या उत्सवांमध्ये" वापरल्या जाणाऱ्या "DJ" प्रकाराबाबत बराच ऊहापोह/ गदारोळ ऐकायला आणि पहायला मिळतोय! कुठे तीव्र विरोध तर कुठे समर्थन! यामुळे सर्वसामान्य जनता भांबावलेली आहे! आपल्याला या वादाचे समर्थन किंवा विरोध याविषयी मत व्यक्त करायचे नाहीय, तर या "ई बुक" मधून "डीजे" म्हणजे नेमकं काय? हे फक्त जाणून घ्यायचे आहे. कृपया या लेखात व्यक्त केलेल्या कोणत्याही माहितीबद्दल किंवा मुद्द्यावर गैरसमज करून घेऊ नये, ही माझी नम्र विनंती.**

**"साऊंड आणि संगीत" या क्षेत्रातला असल्याने तुम्हां सर्वांसमोर, ती माहिती अगदी आपलेपणाने मांडतोय! इच्छुकांनी ती नक्की वाचावी, ही नम्र विनंती.**

**थोडसं भूतकाळात डोकावायचं तर, एक गोष्ट मी इथे "ऑडिओ" क्षेत्रातील स्थित्यंतराबाबत "अभ्यास" करणाऱ्यांसाठी आवर्जून सांगू इच्छितो! माझ्या.. म्हणजे १९६० च्या दशकात जन्मलेल्या आमच्या "पिढीने" संगीत (मराठी भावगीते, भक्तिगीते, चित्रपट संगीत) जे त्या**

काळात उपलब्ध असा "७८ आर.पी.एम." नामक रेकॉर्डस् वर ऐकले होते, ते अक्षरश: "मोनो" याच प्रकारात उपलब्ध असायचे. आम्ही ते रेडिओ, समारंभानिमित्त येणाऱ्या "लाऊड स्पीकर"वाल्यांकडून आणि "इराण्यांच्या हॉटेला तील" तिथल्या "रेकॉर्ड ज्यूक बॉक्स" या उपक्रमांमधून ऐकत असू. (सदर "ज्यूक बॉक्स" चा "व्हिडिओ" अवश्य पहा!) तर "डीजे" हा प्रकार आमच्या पिढीने तर कधीच ऐकला नव्हता!

आपण "व्हिनाईल रेकॉर्डस्" नेमक्या कधी आल्या, ही गोष्ट जेव्हा चाचपडून पाहतो तेव्हा कळतं की तसल्या.... रेकॉर्डस् आपल्याकडे अंदाजे १९७० नंतर/किंवा १९७२ च्या दरम्यान आल्या असाव्यात. कारण आम्ही एकंदर अनुभवल्याप्रमाणे, जेव्हा त्या "लाऊड स्पीकर्स" वाल्यांकडे आल्या तेव्हाच आम्हाला कळल्या, त्याचा नेमका इतिहास माहीत नाही. कारण आम्ही त्या काळात केवळ बारा-तेरा वर्षांचे होतो. असो!

आत्ता मुख्य विषयाकडे वळूया. मी लहानपणी राहत

होतो, त्या "मुंबई सेंट्रलच्या बी.आय.टी. चाळींपासून जवळच्या म्हणजे "मिनर्व्हा सिनेमा थिएटर" कडे जाणाऱ्या मार्गावर "बनकर बिल्डिंग" समोर एक "इराण्याचे हॉटेल" होते/ आताचे माहीत नाही!! (याच विभागात सन्मा. "बोमन इराणी, माणेक इराणी, सुनील शेट्टी याचे "मिसचिफ' हे "जीन्स" मिळण्याचे "शॉप" होते. आणखी महत्त्वाचे म्हणजे नंतर आमच्या "व्हीनस म्युझिक कंपनीचे" हेड ऑफिस सुद्धा याच विभागात होते व बरं का!) असो!

तर त्या अमुक "इराण्याच्या हॉटेलमध्ये" उपलब्ध असलेल्या "ज्यूक बॉक्स" मुळे आम्हाला छान छान गाणी ऐकायला मिळायची. (आधी "७८ आर. पी. एम. रेकॉर्डस्" चा "ज्यूक बॉक्स" होता, त्यावर ते गाणी ऐकायचे. नंतर

"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर

"४५ आर. पी. एम" च्या छोट्या रेकॉर्डस् येताच तिथे मग तत्कालीन अद्ययावत असा "ज्यूक बॉक्स" आला असे एका ज्येष्ठ काकांनी सांगितले होते.)

आमची पिढी १९७२ च्या काळात अंदाजे "आठवीत" असताना आम्ही इथे "खिमा-हाफ फ्राय" खाताना तिथे नव्याने आलेल्या "ज्यूक बॉक्स" वर "चार आण्याचे" नाणे टाकून "ई पी" रेकॉर्डस् वरील गाणी मी ऐकली आणि अनुभवली आहेत! ते यंत्र ज्याप्रकारे कार्य करायचे, ते पाहून आम्ही बच्चेकंपनी थक्क होऊन जात असू.

यावरून मला तरी वाटतं की "डिस्क जॉकी" ही संकल्पना, या "ज्यूक बॉक्स" यंत्रावरून सुचल्याचे नाकारता येत नाही. कार्य तर तसेच आहे. तिथे "यंत्र" होते,

"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर

तर तसल्याच प्रकारचे कौशल्यपूर्ण कार्य एका तज्ज्ञ व्यक्तीकडून "लाइव्ह" प्रकारे सादर करावं अशी संकल्पना सुचली असावी, नाही का? उपस्थित रसिकांना "संगीताचा आनंद" द्यावा, हाच तर "फंडा" होता!

थोडक्यात सांगायचं तर त्यानंतर आलेले ते अमुक "डीजे" म्हणजेच "डिस्क जॉकी" ही संकल्पना, याचं मूळ हे हेच "रेकॉर्ड ज्यूक बॉक्स" असावेत, असं मला तरी वाटतं!

सदरची ही "डिस्क मिक्सिंग" अंदाजे १९८५ च्या दरम्यान लोकप्रिय झाली, हे सत्य आहे! त्या काळात (मी हे प्रत्यक्ष अनुभवले आहे!) उपलब्ध झाले. आमची सुरुवात केवळ दोन ऑडिओ "ट्रॅक्स"ने झालेली. आता

"कॉम्प्युटर्स" वर उपलब्ध झालेल्या अमुक "सॉफ्टवेअर्स" मुळे ती चक्क "आठ ट्रॅक्स" वर पोहोचली. नंतर नव्याने अनेक "साऊंड मिक्सर्स"च्या "मशिन्स" अचानक बाजारात आल्या होत्या. (त्या "चायनाच्या" नव्हे तर "जपान" किंवा "कोरिया" मेड असत!) त्या क्षणी अशी अनेक "सॉफ्टवेअर" अचानक आणि सहजगत्या उपलब्ध झाल्याने सर्वच जण भांबावून गेले होते.

आमच्या काळात "ऑडिओ रेकॉर्डिंग स्टुडिओज" मध्ये "मॅग्नेटिक टेप्स"चा उपयोग केला जात असे. यामुळे अचानक आलेल्या या प्रकारामुळे "रेकॉर्डिंग इंजिनियर्स" सह आमचे "ऑडिओ मिक्सिंग" क्षेत्र अक्षरशः हादरले होते.

"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर

सुरुवातीला स्टुडिओतील आमच्या "ऑडिओ एडिटिंग" क्षेत्रात त्या क्षणापर्यंत "साऊंड फोर्ज" आणि नंतर "न्यूएन्डो" ही दोनच "ऑडिओ एडिटिंग" सॉफ्टवेअर्स उपलब्ध होती. जी आम्ही मनसोक्त वापरत असू!

(बाय द वे! नंतर हा "डीजे" नामक प्रकार भले आत्ता आला असेल! पण त्यासाठी गरजेचं काय होतं ठाऊक आहे? तर ते होते "मल्टी-ट्रॅक्स"! इथे कृपया "विषयांतर" होतेय असं अजिबात समजू नका! कारण आपल्याला त्या अमुक विषयाच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहेच. (निदान अभ्यासकांसाठी तरी!) तुम्हाला माहीतच असेल की कोणतेही गाणे हे आधीच्या काळात "सिंगल ट्रॅक" (मोनो) वरच रेकॉर्ड करावे लागत असे!

या "ऑडिओ मॅग्नेटिक टेप्स" असायच्या! ("मॅक्सेल" तसेच बी.ए.एस.एफ. या जपानी कंपनीच्या!) या "हाफ इंच" ऑडिओ रेकॉर्डिंग स्पूल्स" उपलब्ध असायच्या! त्यावर "दोन ऑडिओ ट्रॅक्स" उपलब्ध होऊ लागले! मग काय! अभ्यासक "ऑडिओ रेकॉर्डिंग इंजिनियर्स" यांनी

आपल्या बुद्धिकौशल्यावर विचार करायला सुरुवात केली. मग आपल्या "हिंदी चित्रपट संगीतातील" सर्वथा पाहिलं "स्टिरीओफोनिक रेकॉर्डिंग" कोणतं असेल बरं! अरे यार! आता "डीजे" वगैरे बाता मारताहेत ना? त्यांना ठणकावून सांगा! आमच्या पिढीने "हिंदी चित्रपट" संगीतातील पूर्णतः "पहिलं-वहिलं" असं "स्टिरीओफोनिक साऊंड रेकॉर्डिंग" आम्ही साक्षात अनुभवलंय! १९७० चा काळ होता तो! (तुम्हाला "डीजे" चं मूळ शोधायचेय ना? मग गपगुमान वाचा! तर..हे अत्यंत महत्त्वाचे आहे!!)

सन्मा. "चित्रपती" म्हणजेच "व्ही. शांतारामजी" हे खरोखरच "ग्रेट" होते, यात शंकाच नाही! तर त्यांच्या "राजकमल" या सुप्रसिद्ध "ऑडिओ रेकॉर्डिंग स्टुडिओ" मध्ये "सन्मा. श्री. मंगेश देसाईजी" नामक अत्यंत "जिनिअस" असे "रेकॉर्डिंग इंजिनियर" होते. हे साहेब त्या काळात "रेकॉर्डिंग" क्षेत्रात नवनवे प्रयोग करण्यात वाकिफ़ होते. "रेकॉर्डिंगच्या" त्या "स्पूल्सवर" दोन "ट्रॅक" उपलब्ध होत आहेत म्हणता, अत्यंत आनंदाने त्यांनी त्यावर

खूप खूप अभ्यास केला. "जल बिन मछली, नृत्य बिन बिजली" या चित्रपटाची "गाणी" रेकॉर्ड होणार असल्याचे समजले. मग काय!

त्याचे संगीतकार "लक्ष्मीकांत - प्यारेलाल" यांना आपलेपणाने संपर्क केला. या संगीतकार जोडीबरोबर त्यांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्यांनी आपली संकल्पना त्यांना आपलेपणाने, सविस्तरपणे सांगितली. (लक्षात घ्या! त्या क्षणापर्यंत आपल्या "म्युझिक इंडस्ट्रीमध्ये" एखाद्या "चित्रपटासाठीचे" संगीत हे केवळ आणि केवळ "मोनो" म्हणजे "सिंगल ट्रॅक" मध्येच "रेकॉर्ड" होत असे!)

एक महत्त्वाचं सांगतोय! कोणताही संगीतकार.. आपण स्वतः साकारलेल्या सांगीतिक "कॅनव्हास" मध्ये कुणाचीही ढवळाढवळ किंवा हस्तक्षेप कदापि सहन करतच नसतो. (मी एका मातब्बर "म्युझिक कंपनीचा" एक "रेकॉर्डिंग इन-चार्ज" म्हणून हे प्रत्यक्ष अनुभवले आहे.) इथे गोष्टच वेगळी होती. गाणं पूर्णतः तयार होतं. केवळ सादर

करायचं होतं. सर्व काही "प्लॅन" केलं गेलं! मात्र सर्व "म्युझिसियन्स" तर खूपच "कन्फ्युजले" होते! असो! शेवटी ते गाणं रेकॉर्ड झालं! "ऐसे तडपू के जैसे जल बिन मछली.." हा "रिझल्ट" आपल्या समोर आहे!

"मॉरल ऑफ द स्टोरी" सांगायची तर.. आपल्या "भारतात" शेवटी "स्टिरीओफोनिक साऊंड" ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली! याचं पुढे फलित काय? तर आपल्या देशात "स्टिरीओफोनिक साऊंड" ही संकल्पना पुढे अगदी खास अभ्यासपूर्ण मेहनतीमुळे पुढे जोमाने विकसित झाली. याचेच फलित, हे आत्ताचे "डीजे" अर्थात "डिस्को जॉकी" ही संकल्पना!

तर "डीजे" (DJ) म्हणजे नेमकं काय? तर तो 'डिस्क जॉकी' याचा हा "शॉर्ट फॉर्म" आहे! त्याला सर्वसामान्य "लाऊड स्पीकर"वाल्यांनी चक्क आपल्या व्यावसायिक दृष्टीकोनातून "डीजे" असे गोंडस नाव दिलेले आहे! केवळ मोठ्या "स्पीकर्स"च्या, मोठ्ठाल्या भिंती उभारत दणदणीत (लाऊड) आवाजात "संगीत" सादर करणे म्हणजे "डीजे"

होत नाही. ही आपली चक्क "फसगत" आहे. (एखाद्या "किराणा मालाचे" दुकान, केवळ आकाराने मोठे असल्याने तो "सुपर मार्केट" अशी पाटी लावतो ना? अगदी तसेच!)

"डीजे" (DJ) म्हणजे (Disc Jockey)! ज्याचा सरळ अर्थ असा की रेकॉर्ड केलेले संगीत, स्वत:च्या खास सकल्पनेच्या अनुषंगानॅ निवडणे, एकत्र मिसळणे (मिक्स करणे) आणि श्रोत्यांसमोर परिणामकारकरित्या सादर करणे असा होतो! आता या "डीजे" नावाची उत्पत्ती कधी व कशी झाली, हे पाहूया!

१९३५ मध्ये अमेरिकेचे रेडिओ समालोचक 'वॉल्टर विन्चेल' यांनी रेडिओ उद्घोषक 'मार्टिन ब्लॉक' यांच्या

साठी "डीजे" (DJ) म्हणजे (Disc Jockey) हा शब्द पहिल्यांदा वापरला होता, असे वाचनात आले आहे. त्याच्या भारतातल्या आगमनाबद्दल सांगायचं तर १९७५ ते १९८० या दरम्यान... (अरे हो! एक महत्त्वाचं सांगायचं राहिलंच की! या आधी ७८ आर.पी.एम.च्या रेकॉर्डस् असायच्या, हे तुम्ही जाणताच! या रेकॉर्डस् पूर्णत: 'मोनो' म्हणजे 'वन-ट्रॅक'! थोडक्यात, याचा इथे  काडीमात्रही संबंध नाही. कारण त्या '७८ आर.पी.एम.' च्या तबकड्या "शेलॅक" (Shellac) नावाच्या पदार्थापासून (बनलेल्या असत. त्या वजनाला जड आणि हाताळताना तुटण्याची शक्यता असायची. आम्ही बच्चेकंपनी त्या "रेकॉर्डस्" ना चक्क "डांबराच्या रेकॉर्डस्" म्हणायचो. कारण त्या चुकून किंवा अनवधानाने हातातून निसटल्याच तर त्याच्या "ठिकऱ्या ठिकऱ्या" व्हायच्या!)) तर हा "डीजे" नामक प्रकार "व्हिनाईल" ('पॉलीविनाईल क्लोराईड' (Polyvinyl Chloride-PVC) नावाच्या प्लास्टिकपासून बनवलेल्या) रेकॉर्डस् आल्यानंतरच घडू लागला! याची नोंद घ्यावी!

मी स्वतः किंवा आमच्या पिढीने प्रत्यक्ष (अभ्यासपूर्वक) अनुभवलेल्या प्रसंगातून सांगायचं तर आपल्या स्वतःच्या कानांनी आपण "स्पीकर्स" वरून येणाऱ्या आवाजाबाबत अगदी त्या "ऑडिओ फ्रीक्वेन्सी" चा तांत्रिक दृष्ट्या, ढोबळमानाने विचार केलात, तर तिथे अर्थातच तीन "फ्रिक्वेन्सीज" असतात/ आढळतात! "हाय, मिड-रेंज आणि लो"! लक्षात घ्या, इथे "ट्विटर" हा "हाय फ्रेक्वेन्सी" देतो. मधला मोठा स्पीकर "मिड रेंज" तर.."तिसरा स्पीकर" मुख्यतः "लो रेंज" देतो! हे सरळसाधं 'क्यॅल्क्यूलेशन' आहे! मात्र १९८५ नंतर आपल्या "ऑडिओ" क्षेत्रामध्ये बरेच उल्लेखनीय असे आपसुकच बदल झाले! जिनियस तंत्रज्ञांनी आपल्या "कौशल्यातून" अधिकची जबरदस्त अशी "लो फ्रिक्वेन्सी" मिळण्यासाठी एक खास "वूफर" नावाचा, अधिकचा "स्पीकर" बनविला, जो एकूणच "ऑडिओ" सादरीकरणामध्ये एक खास आणि जबरदस्त असे सादरीकरण करू लागला. अर्थातच "नवे नवे, मज नित्य हवे!" अशा अनेक मानसिकतेतील

सर्जनशील "तंत्रद्यांकडून" तो प्रकार, अगदी सहजच वापरला जाऊ लागला. (आपल्या आवडत्या "ए. आर. रहमान" या संगीतकाराने त्याच्या "चल छैया छैया.." मधून अगदी मस्तच प्रकारे "बेस किक्स" चा वापर केला होता, पण त्याचा (आत्ताचा) "वाईट परिणाम" पाहून तो सुद्धा किती धास्तावला असेल, याची कल्पनाच करवत नाही!

सध्याच्या त्या अमुक सादरीकरणाचा आवाज इतक्या "बेस" चा असतो, की त्या अतिशय "लो-साऊंड फ्रिक्वेन्सी" मुळे कानांच्या पडद्यांना बाधा होऊ शकते,

आवाजाने छाती दडपते, घरातील खिडकीच्या काचा तर कंप पाऊन त्या फुटू शकतात, असा अनेकांचा अनुभव तर आहेच तसेच "तज्ज्ञ" मंडळींनी त्यावर भाष्य केलेले आहे,

हे तुम्ही जाणताच. हाच तर सध्याचा कळीचा मुद्दा आहे! "स्टिरीओ" प्रकारातील सर्व "गाणी" ऐकण्यासाठी "वूफर" आवश्यक आहे यात शंकाच नाही. परंतु तो अमुक "डेसिबल" मध्ये वाजवला तरच तो "वूफर", गाण्यातल्या "बेस किक्स"चा श्रोत्यांना मनमुराद आनंद देतो. पण जर त्याचा "वॉल्युम" अधिक प्रमाणात ठेवला तर त्याचा भयंकर त्रास होतो. ऐकण्याचे एकंदर गणितच बदलून जाते! (दिलेला "व्हीडिओ" नक्की पहा, ही विनंती!) ते त्रासदायक ठरते! ऐकणाऱ्यांना कान, हृदय यासह अनेक शारीरिक त्रासांना सामोरे जावे लागते, हे सिद्ध झाले आहे!

"इंटरनेट" वर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार पहायचं तर.. १९७० च्या उत्तरार्धात आणि १९८० च्या दशकात मुंबई आणि गोव्यातील तत्कालीन "नाईट क्लब्स" वगैरेमधून या "डीजे" संस्कृतीची सुरुवात झाली. (अर्थात याचं मूळ "इराणी हॉटेल्स" मधल्या त्या "रेकॉर्डस्" वाजवणाऱ्या "ज्यूक बॉक्स" या यंत्राचा प्रभाव आणि अर्थातच त्या क्षेत्रातील काही बड्या मंडळींच्या "परदेश

दौऱ्यांमुळे" ते इथे रुजलं असल्याची शक्यता नाकारता येत नाही.) त्या "रेकॉर्ड ज्यूक बॉक्स" मध्ये भले आधीच्या काळात उपलब्ध असलेल्या "७८ आर. पी. एम." नामक "रेकॉर्डस्" असत. मात्र "डीजे" प्रकाराचे त्यानंतरच्या काळाचे स्वरूप पाहता मात्र थक्क व्हायला होतं! ती सुरुवात आधी दोन "कॅसेट डेक्स" वापरून करण्यात येऊ लागली. यात बरीच मेहनत व्हायची. पण त्यानंतर अमुक "मिक्सर्स" उपलब्ध होताच "ऑडिओ सी.डी.", "सी.डी. रोम", "फ्लॉपी डिस्क"च्या मदतीने सादरीकरण होऊ लागलं! नंतर जमाना आला तो आधुनिक "कॉम्प्युटर्सचा"! त्या अमुक "संगणकीय" उपकरणाद्वारे "ऑडिओ फाईल्स" अशा सादरीकरणासाठी वापरल्या जाऊ लागल्या. नंतर "न्यू-एन्डो", "साऊंड फोर्ज", "सोनी-वेगास", "प्रो-टूल्स", "ॲडोब", "लॉजिक-प्रो", वगैरे विविध "सॉफ्टवेअर्स" च्या मदतीने आणि विविध "मिक्सर्स" द्वारे विविध प्रकारचे "डीजे" चे अभ्यासपूर्ण सादरीकरण केले जाऊ लागले. हा अगदी अलीकडचाच इतिहास आहे! हा

**सगळा ऊहापोह, आपल्या "साऊंड इंजिनियरिंग क्षेत्रातील अनुभव तसेच "इंटरनेट" वरील माहितीमुळे सादर केला आहे, बरं!**

**परंतु मित्रांनो या माहितीमधून सध्या चर्चेच्या ऐरणीवर असलेल्या.. "डीजे" मुळे निर्माण झालेला नेमका "त्रास" हे अधोरेखित तर अजिबात होत नाहीय, हे माझं एक सर्वसामान्य "श्रोता" म्हणून परखड मत ! यात खरी मेख आहे ती "डीजे" या शब्दाच्या उल्लेखात! मुळात आत्ता "डीजे" यावरून जो वाद सुरू आहे, त्यात "डीजे" या शब्दाचा काहीही संबंध नाही. केवळ सर्वसामान्य "लाऊड स्पीकर्सवाले" आहेत ते! ते प्रामाणिकपणे भले "वूफर**

**स्पीकर्स" च्या इमारती उभारून आपले वैभव दाखवत, आपण सादर करत असलेले "गाणे" किंवा "संगीत" दणदणीत प्रकारे, त्यातील "बेस किक्स" सह कसे जास्तीत जास्त रसिकांना आनंद देतील.. केवळ याच मानसिकतेने व प्रामाणिकपणे संयोजन करतात. आणि तो खेळ आहे केवळ त्यांनी वापरलेल्या त्या अमुक "मिक्सर्सचा"! आणि या दणदणीत आवाजाचे सर्वच सादरीकरण हे त्यांना दिल्या दिलेल्या सूचनांवरून झालेले असेल, हे सत्य नाकारता येत नाही. म्हणजेच यात तो "लाऊड स्पीकर्सवाला" किंवा त्यांना सूचना देणारा तो अमुक "अध्यक्ष" यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे, पूर्णतः चुकीचं आहे! हे स्पष्ट मत आहे! या सादरीकरणातून कुणालाही कोणत्याही प्रकारे त्रास होईल अशी मानसिकता तर अजिबात नसते. ते "क्रूर" नाहीत, किंवा "समाज विघातक व्यक्ती" तर अजिबात नाहीत. तरीही सध्या या विषयावर भयंकर "रान" पेटले आहे! या लेखातून आपल्याला "विरोध" किंवा "समर्थन" द्यायचे नाहीय, तर त्या "डीजे" नामक सादरीकरणामध्ये**

ती अमुक "लो-फ्रिक्वेन्सी" म्हणजे "वूफर स्पीकर्स" मधून येणारी "फ्रीकवेन्सी" ती ऐकणाऱ्या भक्तांना त्रासदायक ठरणार नाही याची काळजी घेतली गेली, तर सर्व काही शक्य आहे. असो! (आपल्या "सोसायटीत" वाजवल्या जाणाऱ्या गाण्यांचा आवाज "दणदणीत" यायला हवा, किंवा आपल्या "गणेश विसर्जन मिरवणुकीत" आपलाच "दणदणाट" व्हायला हवा, हे त्यांना मिळालेल्या सूचनांनुसार असू शकतो, हे सुद्धा नाकारता येत नाही. यात काहीही गैर नाही. थोडक्यात आपण सर्वसामान्य "भक्त"! आपला स्वतःचा उत्सव मस्त "दणक्यात" सादर व्हायलाच हवा! यात द्वमत नसावे! कुणाचा आक्षेपही नसावा! "सार्वजनिक गणेशोत्सव" म्हणजे आपला वर्षातून एकदाच येणारा "भक्तिमय" असा सोहळा! यात कोणतेही "विघ्न" नको! असे बऱ्याच मंडळांनी व्यक्त केलेय, यातच सर्व आले. असो! थोडक्यात "डीजे" हे केवळ एक "गोंडस" नाव आहे! त्यामागे कोणताही "हेतू" नाहीय! पण त्यावर "गदारोळ" झालाय यांचं मनोमन वाईट वाटतं! ("लाऊड

स्पीकर्सवाल्यांच्या" सादरीकरणाला "डीजे" हे नाव देणे, म्हणजे एखाद्या किराणा माल विकणाऱ्या वाण्याने केवळ आपले "किराणा मालाचे दुकान" मोठे आहे म्हणून "सुपर मार्केट" असा "बोर्ड" लावावा ना, तितकेच आहे!)

"डीजे" या विषयी खोलात जाऊन विचार करता.. "डीजे" म्हणजे नेमके काय!? हा प्रश्न स्वाभाविकपणे सामोरा येतो. या 'डीजे" चे नेमके काय व त्याचे मुख्य प्रकार पाहता काही गोष्टी सहजच सामोऱ्या येतात.. यात पहिले म्हणजे "रेडिओ डीजे" : जे हल्ली "रेडिओ स्टेशन" वर "गाण्यांचे कार्यक्रम" सादर करत असतात! याबाबतीत अगदी छातीठोकपणे सांगायचे तर हे सादरीकरण केवळ (आजही) "मोनो" या प्रकारातलेच असते! या सादरीकरणात "ऑडिओ" या "फ्रेक्वेन्सी" या "मिड-रेंज" याच प्रकारातील असतात. हे "मोनो" प्रकारात असल्याने यात त्या गाण्यातील "बेस-किक्स" येऊच शकत नाहीत. हे सत्य आहे! आता "क्लब डीजे" (म्हणजे जे "नाईट क्लब" किंवा मोठ्या "संगीत महोत्सवांमध्ये" गाणी वाजवतात.)

या प्रकाराबद्दल सांगायचे तर हे प्रकार आपल्याकडे लग्न, वाढदिवस किंवा सार्वजनिक उत्सवांसारख्या खाजगी तसेच सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अगदी शिताफीने.. "संगीत" वाजवण्याच्या नावाखाली वाजवले जातात हे लक्षात घ्या!

यामध्ये सादर होत असलेल्या आपल्या त्या "गाण्यांना" अधिकचे "बेस किक्स" देऊन सादर करण्यात काय हशील आहे!? हे मी "अधोरेखित" करत का सांगतोय? कारण मी हे पाहिलंय! अनुभवलेय! कारण या महाभागांची इम्प्रेशन करण्याची... जमापुंजी असते.. ती त्यांची "साऊंड सिस्टिम!" आणि यात उपयोगात आणलेली ती आपल्या "वूफर स्पीकर्स" या तंत्राची एक खास "गिमिक"! असो! यामध्ये प्रत्येक ठिकाणी सादरीकरणाची "संकल्पना" ही त्या त्या विषयांवर आधारित असते. पण यातील "तांत्रिक बाब"? यावर कुणीच बोलत नाहीय!

गणेशोत्सवाच्या मिरवणुका सुरू झाल्या की चौकाचौकात डीजेचा आवाज घुमतो. पुण्यात डीजेच्या

भिंती, लेझर किरणं आणि आवाजाच्या मर्यादेवरून वाद पेटले आहेत. 'डीजे वाजणार की नाही?' या एकाच मुद्द्यावर सोशल मीडियापासून कोर्टापर्यंत चर्चा सुरू आहे. पण रस्त्यावर थिरकणाऱ्या ८०% लोकांना या दोन अक्षरांमागील खरी गोष्ट माहीतच नाहीय.

सध्या पुण्यात गणेशोत्सवातील डीजे आणि डॉल्बी स्पीकर्स च्या प्रचंड भिंतींवरून मोठा वाद पेटला आहे. लेझर लाईट्स आणि छातीत धडधड करणाऱ्या बेसवर रात्र-रात्रभर तरुणाई बेभान होऊन नाचते. गणेशोत्सवात सर्वत्र फक्त एकाच गोष्टीची चर्चा रंगते 'डीजे' (DJ)! पण ज्या डीजेच्या तालावर लोकं नाचतात नाचतात, त्याचं मूळ

"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर

**नाव 'DJ' नसून भलतंच काहीतरी आहे, हे ऐकून अनेकांना नवल वाटेल. हा शब्द कुठून आला आणि याचा खरा अर्थ काय, ते आज सविस्तर जाणून घेऊया!**

**ज्याप्रमाणं घोडदौडीच्या मैदानात वेगानं पळणाऱ्या घोड्याला कौशल्यानं नियंत्रित करणाऱ्या स्वाराला 'जॉकी' (Jockey) म्हणतात, अगदी त्याचप्रमाणं जुन्या काळात प्लास्टिकच्या गोल फिरणाऱ्या तबकड्यांवरून (Vinyl Records) गाण्यांचा वेग आणि ताल अचूकपणे हाताळणाऱ्या कलाकारालाही हेच विशेष नाव देण्यात आलं. जुन्या काळातील प्लास्टिकच्या डिस्क (तबकड्या) कालबाह्य झाल्या आहेत. त्यांची जागा आता अत्याधुनिक लॅपटॉप्स, पेनड्राइव्ह, सॉफ्टवेअर्स आणि डिजिटल**

**"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर**

मिक्सर्सनी घेतली आहे. तरीही लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी ही कला आणि ते 'डीजे' हे ऐतिहासिक नाव आजही जगभरात तसेच टिकून आहे.

जुन्या काळात गाणी ज्या प्लास्टिकच्या गोल फिरणाऱ्या तबकडीवर असायची, त्याला 'डिस्क' (Disc) म्हटले जायचे. या डिस्कला आपल्या कौशल्यानं हाताळून, गाणी मिक्स करून लोकांना अखंड नाचवणाऱ्या व्यक्तीला 'जॉकी' म्हटले गेले. या दोन शब्दांच्या संयोगातूनच संगीताच्या दुनियेतील सर्वात मोठी ओळख निर्माण झाली. आपण ज्याला सहज 'डीजे' म्हणून हाक मारतो, त्याचे खरे पूर्ण नाव 'डिस्क जॉकी' (Disc Jockey) असे आहे! 'डीजे' हा केवळ या दोन शब्दांचा शॉर्ट फॉर्म आहे. म्हणजेच तबकड्या कौशल्यानं हाताळून माहोल तयार करणारा कलाकार म्हणजे डिस्क जॉकी.

सध्याच्या काळात लग्नकार्य, सण-उत्सव आणि वेगवेगळ्या पार्ट्यांमध्ये 'डीजे' (DJ) लावणे ही एक फॅशन बनली आहे. मात्र, मनोरंजनाच्या नावाखाली वाजवला

**जाणणारा हा डीजे अनेक गंभीर आजारांना आणि शारीरिक त्रासांना कारणीभूत ठरत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO), मानवी कानांसाठी ७० डेसिबलपर्यंतचा आवाज सुरक्षित मानला जातो. परंतु, डीजे आणि मोठ्या साऊंड सिस्टीमचा आवाज अनेकदा १२० ते १५० डेसिबल किंवा त्याहून अधिक असतो, जो थेट मृत्यूलाही आमंत्रण देऊ शकतो.**

**"डीजे"च्या या अमर्याद आवाजामुळे मानवी शरीरावर आणि मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर आजार व त्रास यावर "तज्ज्ञ" मंडळींनी "इंटरनेट" वर अभ्यासपूर्ण माहिती दिली आहे :**

**१. श्रवणशक्तीला कायमचा धोका (बहिरेपणा) :**

**मोठ्या आवाजाचा सर्वात पहिला आणि मोठा फटका आपल्या कानांना बसतो. अतितीव्र आवाजामुळे कानाच्या पडद्यावर प्रचंड दाब येतो आणि कानातील श्रवणाशी संबंधित नसा हळूहळू कमकुवत होतात. यामुळे तात्पुरता किंवा कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. तसेच**

**कानात सतत शिटी वाजल्यासारखा किंवा मधमाशा गुणगुणल्यासारखा आवाज येणे, ज्याला वैद्यकीय भाषेत 'टिनिटस' (Tinnitus) म्हणतात, हा गंभीर आजार जडू शकतो.**

**<u>२. हृदयविकाराचा आणि हार्ट अटॅकचा धोका</u> :**

**"डीजे"च्या बेसचा दणदणाट थेट छातीत धडधड निर्माण करतो. तीव्र आवाजामुळे शरीरातील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे रक्तदाब (High Blood Pressure) अचानक वाढतो आणि हृदयाचे ठोके अनियंत्रित होतात. कानाची जी नस हृदयाला जोडलेली असते, ती या मोठ्या आवाजामुळे उत्तेजित (Stimulate) होते. नाजूक हृदय असलेल्या व्यक्तींना किंवा अगदी तरुणांनाही यामुळे 'सायलेंट हार्ट अटॅक' किंवा 'सडन कार्डियाक अरेस्ट' (हृदयक्रिया बंद पडणे) येण्याचा धोका प्रचंड वाढतो.**

**<u>३. मानसिक ताण आणि चिडचिड</u> :**

**कर्कश आवाजामुळे शरीरात स्ट्रेस हार्मोन्सची**

पातळी वाढते. यामुळे मानसिक आरोग्य बिघडून तीव्र चिडचिड, अस्वस्थता, एकाग्रता भंग होणे आणि मानसिक ताण (Stress & Anxiety) वाढतो. सतत अशा वातावरणात राहणाऱ्या लोकांमध्ये नैराश्याची (Depression) लक्षणेही दिसून येतात.

४. मेंदूवर आघात आणि ब्रेन हॅमरेज :

अतितीव्र डेसिबलचा आवाज थेट मेंदूच्या नसांवर आघात करतो. यामुळे तीव्र डोकेदुखी आणि अचानक चक्कर येणे यांसारखे त्रास उद्भवतात. काही अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये, "डीजे"च्या अतिधक्क्याने मेंदूतील रक्तवाहिनी फुटून 'ब्रेन हॅमरेज' (Brain Haemorrhage) झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

५. निद्रानाश आणि थकवा :

"डीजे"च्या आवाजामुळे रात्रीची झोप पूर्णपणे विस्कळीत होते. झोपमोड झाल्यामुळे शरीराला पुरेशी विश्रांती मिळत नाही, परिणामी डोके जड होणे, दिवसभर थकवा जाणवणे आणि स्मरणशक्ती कमकुवत होणे अशा

**तक्रारी सुरू होतात.**

**<u>६. गरोदर महिला/ बालकांवर घातक परिणाम</u> :**

**गर्भवती महिला जर दीर्घकाळ "डीजे"च्या मोठ्या आवाजाच्या संपर्कात आल्या, तर गर्भातील शिशूच्या श्रवणशक्तीवर जन्माआधीच वाईट परिणाम होऊ शकतो. तसेच तीव्र मानसिक तणावामुळे गरोदरपणात गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका असतो. लहान मुलांच्या नाजूक कानांना आणि मेंदूलाही हा आवाज सहन होत नाही.**

**<u>सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी</u> :**

*** "डीजे" किंवा मोठ्या स्पीकर्सच्या अगदी जवळ उभे राहणे टाळा.**

*** मिरवणुकांमध्ये किंवा कार्यक्रमात जाताना कानात 'इअरप्लग्ज' (Earplugs) चा वापर करा.**

*** अस्वस्थ वाटू लागल्यास किंवा छातीत धडधड वाढल्यास त्वरित त्या ठिकाणाहून दूर व्हा.**

*** ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना "डीजे"च्या आवाजापासून लांब ठेवा.**

***निष्कर्ष :* उत्सव आणि आनंद साजरा करणे चुकीचे नाही, परंतु तो इतरांच्या जीवावर बेतणारा नसावा. साऊंड सिस्टीमच्या मर्यादित आवाजाबाबत प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करणे आणि स्वतःहून जागरूकता निर्माण करणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे.**

**(<u>विशेष आभार</u> : डॉ. गणेश भामरे ('रेटिना' विशेषज्ञ) आणि डॉ. सचिन कासलीवाल (नेत्ररोगतज्ज्ञ, साभार : नाशिक नेत्ररोगतज्ज्ञ संघटना)**

**<u>सण-उत्सव आणि कायदेशीर नियम</u> :**

**(महाराष्ट्र संदर्भ) ध्वनिमर्यादा : न्यायालयाच्या निर्देशानुसार उत्सवांमध्ये आवाजाची मर्यादा ६० ते ७० डेसिबल ठरवून देण्यात आली आहे.**

**आताची स्थिती : गणेशोत्सवासारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर नागपूरसह महाराष्ट्रातील काही भागात अतिरिक्त ध्वनिप्रदूषण व सुरक्षिततेच्या कारणास्तव "डीजे" किंवा "लेझर लाईट्स" वर कडक निर्बंध किंवा**

बंदीचे निर्णय घेण्यात आले आहेत. पोलिसांकडून आवाजाची मर्यादा तपासण्यासाठी विशेष यंत्रे वापरली जातात, आणि ७० डेसिबल पेक्षा जास्त आवाज आढळल्यास कठोर कारवाई केली जाते, असे नागपुरात डीजेवरील बंदीनंतर पहिल्या कारवाईमध्ये स्पष्ट केले आहे.

मित्रांनो, मी सुमारे चार दशकाहून अधिक काळ, केवळ आणि केवळ "ऑडिओ" तसेच "व्हिडिओ" क्षेत्रात "निर्मिती, संकलन" (एडिटिंग) वगैरे क्षेत्रात कार्यरत राहिल्याने "डीजे" यासोबत भले "सख्खी" किंवा "सावत्र" बहिण म्हणून का होईना, आपल्या सामोऱ्या येणाऱ्या त्या "लेझर लाइट्स" याविषयी कधीच विचार केला नव्हता! गरजच पडली नव्हती! तर.. या "ई-बुक" मध्ये "डीजे" या विषयावर इतकं काही सांगून तुम्हाला अक्षरशः पिडलेय" तर "इंटरनेट" वरून अभ्यासपूर्ण माहिती मिळवत,"लेझर लाइट्स" बद्दल सुद्धा आपलेपणाने सांगतो. कारण तरुण पिढीतील, त्या विषयावरील "अभ्यासकांना" ते उपयुक्त ठरेल या मानसिकतेतून सादर करतोय! नक्की वाचा, ही

**विनंती! धन्यवाद!**

**"डीजे" ला साथसंगत करणारा तो "लेझर शो" म्हणजे काय!? त्या अमुक "कॉम्प्युटरवरील" त्या अमुक "सॉफ्टवेअरच्या" मदतीने ती अमुक "डीजे" म्हणजे "डिस्क जॉकी", ही व्यक्ती आपले "निवडलेले संगीत" यांचे त्या "ऍप्लिकेशन" द्वारे प्रसारित करत असते. तो अमुक "डिस्क जॉकी" आपल्या सादरीकरणात त्या "ऍप" चा कौशल्यपूर्ण वापर करत, एकीकडे ते गाणे वाजताना, त्याच क्षणी "लाइट्सना" आपल्या सादरीकरणाची "जोड" देतो. तर.. "लेझर लाइट्स" हे असे उपकरण आहे, की "प्रकाशाची" तीव्रता एका विशिष्ट दिशेने "केंद्रित" करून वाढवते. हाच तर कळीचा मुद्दा आहे. लेझर केवळ प्रकाशाची तीव्रता वाढवत नाहीत, तर प्रकाश निर्माण करतात आणि तो उत्सर्जित करतात, ज्यामुळे किरणोत्सर्गाची तीव्रता वाढते. हा प्रकाश संगीतावर इतरत्र प्रसारित केला जातो. कमाल आहे, हे सगळं! (या "लेझर शो" बद्दलची अधिक माहिती अभ्यासपूर्ण व सुरक्षितरित्या**

अनुभवायची असेल तर तुम्ही कृपया "Palm Expo" हे प्रदर्शन अनुभवलायच हवेय. हे प्रदर्शन "गोरेगाव पूर्व, Exhibition Center" इथे दर वर्षी होत असते! तुम्हाला अत्युच असा आनंद तर नक्कीच मिळेल. तसंच "ऑडिओ", "व्हिडिओ", "डीजे मशिन्स", "कॅमेरे" यासह "लेझर शो" याबाबतीत अभ्यास करता येईल. "गुगल" वर "सर्च" करून तारीख जाणून घ्या! तिथे आपल्या व्यस्त दिनचर्येतून फुरसतीचा वेळ काढत, नक्की भेट द्या..)

"नाशिक नेत्ररोगतज्ज्ञ संघटनेचे" सन्मा. डॉ. गणेश भामरे सर ('रेटिना' विशेषज्ञ) आणि सन्मा. डॉ. सचिन कासलीवाल सर (नेत्ररोगतज्ञ) यांनी "लेझर शो" व दुष्परिणाम या विषयी "सनातन प्रभात" मध्ये स्वतःचा

"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर

अनुभव आपलेपणाने सांगितला आहे. जो खचितच धक्कादायक आणि मन सुन्न करणारा आहे!

<u>त्यांच्याच शब्दात, जसेच्या तसे सांगायचे तर..</u>

२०२३ ची "अनंत चतुर्दशी" आठवतेय! २८ सप्टेंबर! अनंत चतुर्दशी आनंदात पार पडली. ढोल, ताशा आणि आता 'डीजे'च्या गजरात अनेकांनी नाचत गणपति बाप्पाला निरोप दिला! दुसऱ्याच दिवशी 'मी' (डॉक्टर साहेब) नेहमीप्रमाणे बाह्य रुग्ण विभागामध्ये, नेत्ररोगाचे रुग्ण पाहू लागलो. थोड्याच वेळात एक २० वर्षांचा तरुण 'काल अचानक न्यून दिसायला लागले', म्हणून आला! प्राथमिक पडताळणी करून बघितले, तर त्याची दृष्टी पुष्कळच 'न्यून' झाली होती. मग डोळ्यांचे 'प्रेशर' (दाब) घेऊन त्याला नेत्रपटल पडताळणीसाठी घेतले. बघतो तर काय, त्याच्या नेत्रपटलावर पुष्कळ रक्त मोठ्या प्रमाणात एकाच ठिकाणी गोठले होते आणि नेत्रपटलावर भाजल्यासारख्या जखमा आढळल्या.

<u>१. 'डिजे लेझर शो'मुळे डोळ्यांचा पडदा जळण्याच्या</u>

**<u>घटना उघडकीस येणे :</u>**

**हा आजार नेहमीप्रमाणे वाटणारा नव्हता, याची मला जाणीव झाली. मग मी पुनर्पडताळणीत त्याला विचारले की, काही मार लागला होता का? किंवा तू काही ग्रहण वगैरे बघितले होते का? कि कुठे वेल्डिंग बघितले? तर त्याने यातील काहीच केलेले नव्हते. खोलवर विचार केल्यावर त्याने सांगितले की, काल मिरवणुकीत नाचलो आणि 'डीजे'वर 'लेझर शो' बघितला. मग मनात पाल चुकचुकली आणि 'लेझर शो'चा <u>'लेझर बर्न रेटिना'</u> ('लेझर शो'मुळे डोळ्यांचा पडदा जळणे) असल्याची निश्चिती झाली. मग रेटिनाचा <u>'ऑप्टिकल कोहेरेंस टोमोग्राफी'</u> (ओसीटी – नेत्र-तपासणीचे एक आधुनिक तंत्रज्ञान) स्कॅन करून माझ्या निदानाची निश्चिती केली. पुढच्या दोनच तासात आणखी दोन रुग्ण आले आणि त्यांच्या डोळ्यांच्या पडद्यांवरही याच प्रकारचे चित्र दिसले. यानंतर मी आमच्या नेत्ररोग संघटनेच्या माध्यमातून विचारपूस केली असता अजून दोन रुग्णालयांमध्ये असेच रुग्ण आहेत, असे निदर्शनास आले.**

**याचाच अर्थ पाचहून अधिक तरुण एकाच दिवशी 'डिजे लेझर शो'चे शिकार झालेले पाहिले. यातील बरेच जण अजून कदाचित् आम्हाला कळलेले नसतील किंवा दुसऱ्या जिल्ह्यातही असतील. ही संख्या याहून अधिक प्रमाणात असावी. नेत्रपटलावर आम्ही या प्रकारचे 'लेझर बर्न' क्वचितच बघितले असावेत. हा काहीतरी भलताच प्रकार समोर आला आणि म्हणून जन जागृतीसाठी हा पत्रप्रपंच !**

**२. ...बंदी न आणल्यास तरुणांचे भवितव्य अंधकारमय!**

**मग प्रश्न पडला की, ठराविक लोकांनाच असे का झाले ? याचा खोलवर अभ्यास केल्यावर कळाले की, या 'ग्रीन लेझर'ची 'फ्रिक्वेन्सी' पुष्कळ अधिक होती अन् ज्या युवकांनी त्या लेझरच्या फ्रिक्वेन्सीच्या 'फोकल लेंथ'वर नेत्रपटल आले, त्यांच्या समवेत हे प्रकार घडले. आपण लहानपणी भिंग घेऊन उन्हात कागद पेटवायचो, तसाच प्रकार या 'लेझर'ने या तरुणांवर केला होता. अशा प्रकारच्या 'लेझर' वापरावर बंदी आणण्याची आवश्यकता आहे. अन्यथा याचे भयंकर परिणाम येणारा "नवरात्रोत्सव"**

**आणि "दीपावली" यांमध्ये दिसतील अन् कित्येक निष्पाप लोकांची दृष्टी यात जाईल. दिखाऊपणासाठी वापरण्यात येणाऱ्या 'डिजे लेझर'चा इतका वाईट परिणाम सामान्य नागरिकांवर होईल, याची यत्किंचित कल्पनाही करवत नाही. या सगळ्या तरुण-तरुणींना झालेला नेत्रपटल दोष त्यांच्या पुढील भविष्यासाठी किती भयावह असेल? यातील बरीच मंडळी उच्च शिक्षण घेणारी होती. प्रशासनाने वेळीच याची नोंद घ्यावी आणि हा प्रकार थांबवावा. नाहीतर अंधत्वाचा भूकंप आपली वाट बघत आपल्या तरुण पिढीचा घास घेईल.**

**(खरेतर प्रशासनाने 'डीजे लेझर शो'च्या वापरावर स्वतःहून बंदी घालायला हवी. त्यासाठी प्रशासनाने रुग्णसंख्या वाढण्याची आणि 'डीजे लेझर शो'वर बंदी घालण्याच्या मागणीची वाट कशाला पहावी ? कुणी मागणी केल्यावर 'डीजे लेझर शो'वर बंदी घालण्यापेक्षा दुष्परिणाम जाणून त्यावर स्वतःहून बंदी घालणारे प्रशासन हवे ! – संपादक, "सनातन प्रभात")**

**"डीजे" जल्लोष ♥© लेखक : डॉ. अनंत पावसकर**

**(आभार! – लेखक : डॉ. गणेश भामरे ('रेटिना' विशेषज्ञ) आणि डॉ. सचिन कासलीवाल (नेत्ररोगतज्ञ) आणि "सनातन प्रभात")**

**<u>'लेझर'पासून असा बचाव करा :</u>**

- **थेट नजरेचा संपर्क टाळा.**
- **किरणे आपल्या चेहऱ्याच्या किंवा डोळ्यांच्या दिशेने येत असल्याचे दिसताच त्वरित डोळे मिटा किंवा चेहरा दुसरीकडे फिरवा.**
- **'लेझर शो' किंवा मोठ्या मिरवणुकांमध्ये सहभागी होताना विशिष्ट दर्जाचा प्रोटेक्टिव्ह किंवा गॉगल चष्मा वापरा.**
- **'लेझर'च्या स्रोतापासून शक्य तितके लांब उभे राहा.**
- **लहान मुलांचे डोळे अधिक नाजूक असतात. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी मुलांना थेट त्या किरणांसमोर उभे राहू देऊ नका.**
- **'लेझर'ची किरणे डोळ्यात पडल्यानंतर अंधारी आल्यास, डोळे दुखल्यास किंवा धुरकट दिसू**

लागल्यास घरगुती उपाय न करता त्वरित नेत्रतज्ज्ञांकडे जा.

**<u>'लेझर'च्या तीव्र किरणांमुळे डोळ्यांना होणाऱ्या समस्या (तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार)</u>**

- डोळ्यांच्या मध्यवर्ती दृष्टीसाठी महत्त्वाचा असलेला 'मॅक्युलार' हा भाग 'लेझर'च्या उष्णतेमुळे भाजला जातो. यामुळे वस्तूच्या मध्य भागातील दृश्य धुरकट दिसते किंवा पूर्णपणे काळे दिसते.
- 'लेझर'च्या उच्च ऊर्जेमुळे दृष्टिपटलातील अत्यंत नाजूक रक्तवाहिन्या फुटतात. त्यामुळे डोळ्यात अंतर्गत रक्तस्त्राव होतो आणि अचानक दिसेनासे होऊ शकते.
- कॅमेऱ्याचा अचानक फ्लॅश पडल्यावर काही सेकंद किंवा मिनिटे आपल्याला काहीच दिसत नाही, तसाच प्रकार लेझरमुळे होतो. हा तात्पुरता अंधार असतो, परंतु वाहन चालवताना किंवा गर्दीत असा त्रास झाल्यास मोठा अपघात होऊ शकतो.

- डोळ्याच्या बाहेरील पारदर्शक थराला 'लेझर'च्या उष्णतेमुळे इजा पोहोचते. यामुळे डोळ्यात तीव्र वेदना होणे, डोळे लाल होणे, सतत पाणी येणे आणि प्रकाश न सहन होणे या समस्या होतात.
- अति-तीव्र प्रकाशामुळे डोळ्यांतील पेशी रासायनिकदृष्ट्या पेशी नष्ट होतात. या आजारात वस्तूंचे आकार वेडेवाकडे दिसणे किंवा धुरकट दिसणे असा त्रास होतो.
- 'लेझर'ची किरणे तीव्र असतील, तर अगदी काही सेकंद जरी ती थेट डोळ्यांच्या मध्यभागी पडली, तर डोळ्यांतील पेशी पूर्णपणे मृत होऊन कायमचे अंधत्व येऊ शकते.

थोडक्यात सांगायचे तर.. सण-उत्सवांमधील गर्दीत आणि मिरवणुकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अत्यंत तीव्र 'लेझर लाईट्स'मुळे नागरिकांच्या दृष्टीला कायमचा धोका निर्माण होत असल्याचे स्पष्ट करत पुणे जिल्हा प्रशासनाने लेझरच्या वापरावर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय

**घेतला असला, तरी त्याची प्रत्यक्षात काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा वैद्यकीय क्षेत्रासह सर्व स्तरांतील नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.**

**इतरही ठिकाणी त्याचे अनुकरण केले जात आहे, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. जनजागृती होतेय, ही खचितच समाधानाची बाब आहे!**

**धन्यवाद,**

**लेखन/संकलन : डॉ. अनंत पावसकर**
**(ज्येष्ठ लेखक व संगीत विश्लेषक)**

♥

मराठी
साहित्य प्रतिष्ठान®
मुखपान पुस्तके दिशा उपक्रम प्रतिसाद कट्टा आम्ही कोण संपर्क सभासदत्व देणगी
Marathi ebooks, Marathi books
सुस्वागतम
मराठी मित्रमैत्रिणींनो!
ई पुस्तके ! मस्त पुस्तके !! इझी पुस्तके!
छान मराठी पुस्तके ! उत्तम मराठी ई बुक्स !!
Marathi Books , Marathi ebook epustak
मराठी ईपुस्तक, quality epub Books, best Marathi PDF,
Marathi eBook publisher, Marathi Novels, Marathi Story,
Marathi History, Marathi Music, Marathi book publishing,
Marathi epub, Maratha History, Marathi Comedy,
Marathi Drama books, Marathi Sant sahity, Religious
books, Story books, ई बुक मराठी, Marathi epub, epubs
मराठी ई पुस्तक प्रकाशक, मराठी पुस्तक
सभासद व्हा! स्वतःचे पुस्तक प्रकाशित करा !
संगीत
ई-ये मराठीचिये नगरी
जो जे वाचील तो ते लाहो
पुस्तकाच्या कव्हरवर फक्त एक क्लिक आणि पुस्तक उघडेल.
आता सर्व पुस्तकांच्या छापिल आवृत्ती उपलब्ध आहेत. आपली मागणी नोंदवा WhatsApp- 9987737237
https://chat.whatsapp.com/KybNQeSmpaF46C47GyeXQl?mode=ac_t
esahity free ebooks_46
आपण या ग्रुपमध्ये सामील झाल्यावर वर्षाला १०० ते २०० मराठी ई पुस्तकं विनामूल्य नियमित प्राप्त होतील.